


गावातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी घेण्यात आलेल्या
भूमिगत गटारी व शोषखड्डे छायाचित्र



संपूर्ण गावात पिण्याचे पाणी पुरवठा योजना राबवून
प्रत्येक घराला नळाद्वारे शुध्द पिण्याच्या पाण्याची






स्वच्छ भारत मिशन टप्पा-२.० अंतर्गत स्वच्छतागृह, घनकचरा व्यवस्थापन खड्डा, कचरा विलगीकरण शेड, सांडपाणी व्यवस्थापन, शोषखड्डे इत्यांदी कामे करुन गावाची स्वच्छता व आरोग्य वृध्दीस पुरक कामे केली.



रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, प्रधानमंत्री घरकूल योजना यासारख्या विविध योजनांमधून गावातील गरजू व बेघर कुटूंबाना घरकुलाद्वारे पक्का निवारा उपलब्ध करुन दिला.



अनु. जाती व जमातीच्या वस्तीमध्ये रस्ते काँक्रीटीकरण, समाजमंदिर, सभामंडप, दिवाबत्ती, पाणीपुरवठा इत्यादी पायाभूत सूविधा उपलब्ध करुन दिल्यात.





कल्पकतेने गावातील सडलेले पन्नास वर्षांपूर्वीचे विजेचे पोल व ॲल्यूमिनीयम तारा ग्रामपंचायतीचा एक रुपयाही खर्च न करता बदलवून नवीन पोल व कोटींग वायर टाकून संपूर्ण गावातील विद्युत व्यवस्था सुरक्षीत व आधुनिक केली. तसेच १००% विजचोरी रोखली व विज बचतीसाठी पथदिपांना एल.ई.डी. लाईटस् बसविण्यात आले. शिवारातील मुख्य रस्त्यांवर पथदिप व्यवस्था केली तसेच मळे विभागात सौर स्ट्रीट लाईटाची व्यवस्था करुन दिली.

गावाला जोडणारा मुख्य रस्ता तसेच गावांतर्गत सर्व रस्ते विविध योजनेमधून काँक्रीटीकरण करुन पक्के रस्ते केले.











स्मशानभूमी परिसरात ग्रामपंचायत निधी, वित्त आयोग निधी व जनसुविधा निधीमधून दशक्रिया विधी निवारा शेड, पेव्हर ब्लॉक, आर.सी.सी. घाट, स्मशानभूमी परिसरात वृक्ष लावगड, पाण्याची व्यवस्था इ. सर्व कामे कल्पकता लोकसहभाग व निरुपयोगी साहित्याचा वापर करुन (टाकाऊ पासून टिकावू) सुशोभिकरण व अद्ययावत स्मशानभूमी केली.

लोकसहभाग तसेच कंपनी सी.एस.आर. निधीमधून अद्ययावत २० लक्ष रुपये खर्चाची अंगणवाडी इमारत उभारली. गावातील जूने जागृत देवस्थान श्री भैरवनाथ मंदिराचा जवळपास १ कोटी रुपये खर्चाचे मंदिर व सभामंडप लोकवर्गणी व लोकसहभागातून पूर्ण करुन जिर्णोध्दार करुन घेतला. भैरवनाथ मंदिराचे पूर्वीचे साहित्य भंगारात देण्याऐवजी त्याचा पुर्नवापर करुन (टाकावू मधून टिकाऊ) श्री हनुमान मंदिर छताचे काम केले. तसेच स्मशानभूमी परिसरात कमी खर्चात वाढीव निवारा शेड बनविले.










शिवारातील मुख्य रस्त्यांवर पथदिप व्यवस्था केली तसेच मळे विभागात सौर स्ट्रीट लाईटाची व्यवस्था करुन दिली. विज बचतीसाठी पथदिपांना एल.ई.डी. लाईटस् बसविण्यात आले.

ग्रामविकासासाठी लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून विविध विकास कामे करुन गाव भौतिकदृष्ट्या समृध्द केले.
















गावातील ज्येष्ठ नागरीक, युवक मंडळ, तसेच सर्व घटकांना सोबत घेऊन ग्रामविकासात भर घातली.

गावातील ज्येष्ठ नागरीक, युवक मंडळ, तसेच सर्व घटकांना सोबत घेऊन सर्वांना निर्णय प्रक्रीयेत सहभागी करुन ग्रामविकासाचे नियोजन केले व त्याची अंमलबजावणी केली.








माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत प्रति व्यक्ती एक झाड याप्रमाणे गावातील ज्येष्ठ नागरीक, महिला, विद्यार्थी, युवक मंडळ, तसेच सर्व घटकांना सोबत घेऊन सर्वांना गावाच्या विकासात सहभागी करून घेऊन संपूर्ण गाव तसेच मळे विभागात वृक्ष लागवड करुन घेऊन वृक्ष संवर्धन केले.



ग्रामपंचायत हद्दीत ३५०० नवनवीन वृक्षांचे लागवड करुन जतन केले.




गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विविध चांगले काम केलेल्या गावांना भेटी देऊन त्यांचा अभ्यास करुन ग्रामविकास साधण्यात आला.






महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून ग्रामपंचायत अंतर्गत शेतकऱ्यांना २५ सिंचन विहिरी, ३३ गाय गोठे, ७ रेशीम शेती, ७ फळबाग लागवड करुन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी उपक्रम राबवून अंमलात आणले.








बालकांचे सर्वांगीण विकासासाठी त्यांना आवश्यक तो पुरक पोषण आहार पुरवठा, आवश्यक साहित्य, अंगणवाडी डिजीटल करणे इ. कामे केली.






शैक्षणिक, सांस्कृतिक मेळाव्यांचे आयोजन करुन तसेच विविध स्पर्धा व उत्सव आयोजित करुन विद्यार्थ्यांचे कलागुणांना प्रोत्साहनात्मक कार्यक्रम राबविले.






ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांना सामावून घेतले. तसेच गावातील महिलांना एकत्र करुन गावात ३५ बचत गट स्थापन करुन ३ पुर्नजीवीत केले. तसेच गटातील महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन, अभ्यासदौरे करुन रोजगार व कौशल्य वृध्दी केली. त्यांना विविध बँकांच्या सहकार्याने तसेच विविध संस्थांच्या सहकार्याने कर्ज वाटप व रोजगार साहित्य उपलब्ध करुन दिले व त्यांना गावातच रोजगार उपलब्ध करुन दिला.





पुर्ननविकरणीय सौर उर्जेचा वापर वाढविण्यासाठी ३१ शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी सौर उर्जेचा वापर करण्यास प्रवृत्त केले.
इंधन व विज बचतीसाठी २९ बायोगॅस बांधण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करुन मोठ्या प्रमाणात वृक्षतोड वाचविली.











मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियांनातर्गत ग्रामसफाई करतांना ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच बचत गटाच्या महिला











व्यसनमुक्तीसाठी प्रबोधनात्मक पथनाट्याचे जनजागृतीकरीता सादरीकरण

गावात केलेल्या चांगल्या कामाबद्दल गावकऱ्यांतर्फे मानचिन्ह देतांना मान्यवर तसेच शिवजन्मोत्सवात पुजेचा मान देतांना ग्रामस्थ










ग्रामपंचायती मार्फत महिला सक्षमीकरणासाठी विविध प्रकारचे रोजगार विषयक प्रशिक्षण आयोजन करण्यात येऊन महिलांना रोजगारासाठी मार्गदर्शन केले जाते





पर्यावरण संवर्धनासाठी गणेशमुर्ती संकलन व
पुर्नवापरासाठी स्वयंसेवी संस्थेकडे हंस्तातरीत करण्यात आल्या






ग्रामपंचायती मार्फत महिला लखपती दिदीची संख्या वाढविण्यासाठी
रोजगार विषयक प्रशिक्षणाचे आयोजन व मार्गदर्शन










एकल महिला सन्मान अंतर्गत अनुसूचित जमातीचे विधवा महिलेच्या हस्ते २६ जानेवारीला ध्वजपुजन व ध्वजारोहण करण्यात आले











मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान जनजागृतीसाठी बैठक, प्रचारफेरी, किर्तनाचे आयोजन